## <u>निशाणी क्रं.२० वरील आदेश</u>

१. वादींनी प्रस्तुत अर्ज दाव्यात दुरुस्ती करणेकरीता दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केले आहे.

२. वादींनी त्याच्या अर्जात असे कथन केलेले आहे की, प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादी विरुध्द मुस्लीम कायदयाप्रमाणे सरस निरस मानाने वाटप होवुन दिनांक ३१/०५/२००४ रोजीचे तथाकथित रजि. मृत्युपत्र हे बेकायदेशीर व रद्दबातल आहे असे जाहीर होवुन मिळणेकरीता व निरंतर ताकीद मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदर दाव्यात हुकूम झालेला असताना देखील प्रतिवादी क्रं. ३ ते ५ यांनी प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्या नावे दावा मिळकती रजि.खरेदीखताने दिनांक ०३/०४/२०१३ रोजी खरेदी करुन दिलेल्या आहेत. त्यामुळे दाव्यात खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेकरीता प्रस्तुत अर्ज मंजुर करणेची विनंती केलेली आहे. दावा कलम ५ नंतर – **''५अ. प्रतिवादी यांना ........भाग पडत आहे.''**. तसेच दावा कलम ७ नंतर – **''७अ. वादी यांनी .......स्टॅम्प लावला आहे.''**. तसेच दावा कलम ८क नंतर **''८क१. प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी......असे जाहीर होवुन मिळावे.''** तसेच दावा कलम ''**८क२. प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी ....... आदेश देण्यात यावा.''** अशी दुरुस्ती मागितलेली आहे.

३. प्रतिवादी क्रं. १ ते ५ यांनी निशाणी क्रं. २२ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादी कथन करतात की, प्रस्तुत अर्ज बेकायदेशीर

असुन अर्ज मुदतीत नाही. वादींनी प्रस्तुत अर्जात मागितलेल्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार आहे. त्यामुळे प्रतिवादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. तसेच सदर केलेली मागणी प्लीडींगशी विसंगत अशा स्वरुपाची आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने कथन केल्याप्रमाणे त्यांनी प्रस्तुत दावा मुस्लीम कायदयाप्रमाणे सरस निरस मानाने वाटप होवुन जाहीर व निरंतर ताकीद होवुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. दावा प्रलंबित असताना तसेच दाव्याची माहिती प्रतिवादींना असतानादेखील प्रतिवादी क्रं. ३ ते ५ यांनी प्रतिवादी क्रं. १ व २ यांना दावा मिळकती खरेदीखताने हस्तांतर केलेल्या आहेत. त्यामुळे दाव्यात त्याप्रमाणे दुरुस्ती होणेकरीता अर्ज मंजुर करणेची विनंती वादींनी केलेली आहे. याउलट प्रतिवादींनी त्यांच्या कथनात प्रस्तुत अर्ज बेकायदेशीर असुन तो मुदतीत दाखल केलेला नाही. तसेच सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होवुन प्रतिवादींचे नुकसान होणार आहे. तसेच वादींनी केलेली अर्जातील मागणी प्लीडींगशी विसंगत असल्याने नामंजुर करणेची विनंती केलेली आहे. अर्ज व म्हणणेचे अवलोकन केले. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे आवश्यक दुरुस्ती करता येतात. तसेच सदर दुरुस्तीमुळे दाव्यामध्ये बदल होणार नाही शिवाय दावा संपुर्ण गुणदोषावर निर्णय होणे सोयीस्कर होणार आहे. करिता सदरची दुरुस्ती मंजुर करणे न्यायोचित होईल. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | निशाणी क्र. २० वरील अर्ज मंजुर करण्यात येते. |
| २. | अर्जदाराने नियमानुसार १४ दिवसांच्या आत अर्जामध्ये दुरुस्ती करुन, दुरुस्ती अर्जाची प्रत पुढील तारखेपर्यंत अभिलेखावर दाखल करावी. |

Digitally signed by AADITYA AVINASH VYAS
Date: 2026.08.05 16:28:34 +0530

**(आदित्य अ. व्यास)**

दिनांक : ०५.०८.२०२६.

२रे सह दिवाणी न्यायाधिश,क.स्तर,
माळशिरस

**CERTIFICATE**

I affirm that the contents of the P.D.F file Order is same word to word as per the original Order.

(a) Name of the Stenographer :- S.T.Korbu

(b) Name of the Court : 2nd Jt. C.J.J.D & J.M.F.C, Malshiras, Dist. Solapur

(c) Order signed by P.O. On :- 05/08/2026.

(d) Order uploaded on :- 05/08/2026.